पूर्वसेवा जोडून वेतन संरक्षित करण्याबाबत तसेच त्यानुषंगाने सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.
(डॉ. आशिष मनोहरराव महल्ले, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती)

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन आदेश क्र. पूर्वसे-२०२४/प्र.क्र.३०/२४/ई-७४०३३६/तांशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २७ मे, २०२६.

<u>संदर्भ</u> :- १) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ५(३)/तंशिसं/ पूर्वसेवा/ डॉ.महल्ले/२०२४/४८, दि.२०/०२/२०२४
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ५(३)/तंशिसं/ पूर्वसेवा/ डॉ.महल्ले/ २०२६/११, दि.१६/०१/२०२६

<u>प्रस्तावना:-</u>

डॉ. आशिष मनोहरराव महल्ले, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांनी त्यांच्या हंगामी सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून पूर्व सेवा जोडून सेवाविषयक लाभ व जुनी सेवानिवृत्त योजना व वेतनादी लाभ अनुज्ञेय करण्याबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज क्र.३८/२०२१ दाखल केलेला होता. सदर प्रकरणी दि.१४/०७/२०२२ रोजी मा.न्यायाधिकरणाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"The respondents are directed to regularise the service of the applicant from the date of his initial appointment from २२-१०-१९९९ for the purpose of counting his services for pensionery benefits. The respondents are direted to give all the benefits of old pension scheme to the applicant treating his regular service from २२-१०-१९९९."

सदर आदेशाविरुद्ध शासन व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.४७०१/२०२३ दाखल केलेली होती. सदर रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दि.२५/११/२०२५ रोजी आदेश पारित केले असून उपरोक्त मूळ अर्ज क्र.३८/२०२१ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय कायम ठेवला आहे, तो खालील प्रमाणे आहे.

"Having gone through the finding recorded by the tribunal and on perusal of the record we do not find any merit in the present petition as the finding recorded by the Ttribunal are just and proper. Moreover, no perversity has been pointed out in granting such relief and allowing the original application in favour of the respondent."

डॉ. महल्ले, यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ या विद्यापीठांतर्गत लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, नागपूर या संस्थेतील प्रपाठक या पदावरील सेवा त्यांच्या प्राध्यापक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या सेवेस जोडून मिळण्याबाबत व प्रपाठक या पदावरील वेतन संरक्षित करणेबाबतचा प्रस्ताव संदर्भाधिन क्र.१ येथील पत्रान्वये संचालनालयाने सादर केला आहे.

तसेच संदर्भाधिन क्र.२ येथील पत्रान्वये डॉ. महल्ले यांना मा.न्यायालयाच्या आदेशानुसार हंगामी सेवेत रूजू झाल्याच्या दि.२२/१०/१९९९ पासून पूर्वसेवा जोडून सेवाविषयक लाभ व जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने डॉ. महल्ले यांची हंगामी सेवेत रूजू झाल्याच्या दि.२२/१०/१९९९ पासून पूर्वसेवा जोडून सेवाविषयक लाभ व जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची तसेच लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, नागपूर या संस्थेतील प्रपाठक या पदावरील वेतन संरक्षित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन आदेश :-</u>**

मा. महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, खंडपीठ नागपूर यांचे मूळ अर्ज क्र.३८/२०२१ मधील दि.१४/०७/२०२२ रोजीचे आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे रिट याचिका क्र.४७०१/२०२३ मधील दि.२५/११/२०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन, डॉ. आशिष मनोहरराव महल्ले यांच्या दि.२२/१०/१९९९ ते दि.३१/०५/२००० व दि.०१/०८/२००० ते दि.५/८/२००९ या कालावधीतील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील अधिव्याख्याता म्हणून केलेल्या हंगामी सेवेमध्ये झालेला ६१ दिवसांचा सेवाखंड क्षमापित करुन, सदर सेवा ही त्यांच्या दि.०६/०८/२००९ ते दि.११/०१/२०१७ या कालावधीत लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्था, नागपूर या विद्यापीठात केलेल्या प्रपाठक पदाच्या सेवेस जोडण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यांची हंगामी सेवेतील प्रथम रूजू दिनांक २२/१०/१९९९ पासून त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा, (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू असेल.

२. तसेच डॉ.महल्ले यांच्या लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, नागपूर या संस्थेतील प्रपाठक (कॅस अंतर्गत प्राध्यापक) या पदापेक्षा प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक असल्याने वित्त विभाग, शासन निर्णय दि.२३/०३/१९९४ मधील तरतुदींनुसार ७ व्या वेतन आयोगानुसार प्राध्यापक यंत्र अभियांत्रिकी या पदासाठी वेतनस्तर एल-१४ रु.१४४२००-२१८२००/- या वेतनश्रेणीत खालीलप्रमाणे वेतन निश्चितीस मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | नाव | डॉ. आशिष मनोहरराव महल्ले |
|---|---|---|
| १ | लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, नागपूर येथील सेवेतील मूळ पदनाम प्रपाठक/सहाय्यक प्राध्यापक व वेतनश्रेणी | वेतनश्रेणी रु.१५६००-३९१००/- एजीपी रू. ८०००/- |
| | कॅस अंतर्गत दिनांक ०६/०८/२०१२ रोजी सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीची वेतनश्रेणी | वेतनश्रेणी रु.३७४००-६७०००/- एजीपी रू. ९०००/- |
| | कॅस अंतर्गत दिनांक ०६/०८/२०१५ रोजी प्राध्यापक पदावर पदोन्नती | वेतनश्रेणी रु.३७४००-६७०००/- एजीपी रू. १०००० |
| २ | ७ व्या वेतन आयोगानुसार दिनांक ११/०१/२०१७ रोजी लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, नागपूर येथील प्रपाठक (कॅस अंतर्गत प्राध्यापक) पदावरील वेतनस्तर | वेतनस्तर एल-१४, रू. १४४२००-२१८२००/- रू.१४८५००/- |
| ३ | वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०३/१९९४ मधील तरतूदीनुसार प्रपाठक (कॅस अंतर्गत प्राध्यापक) या पदावरील काल्पनिक वेतनवाढीनंतरचे वेतन | रू.१५३०००/- |
| ४ | नव्याने नियुक्ती झालेले पदनाम व वेतनस्तर | प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय एल-१४, रू. १४४२००- २१८२००/- |
| ५ | प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी या पदावर रुजू झाल्याचा दिनांक | रुजू दिनांक : १२/०१/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | दि.१२/०१/२०१७ रोजी प्राध्यापक यंत्र अभियांत्रिकी पदावर वेतन संरक्षित करावयाचे वेतन | एल-१४, रू. १५३०००/- |
| ७ | पुढील वेतनवाढीचा दिनांक व वेतन | दि.०१/०१/२०१८ वेतन रू. १५७६००/- |

३. सदर शासन आदेश वित्त विभाग शासन निर्णय दि.२३/०३/१९९४ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२७१७५४४७६३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.05.27 17:55:41 +05'30'

**(अजित ता. कुंडले)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

डॉ. आशिष मनोहरराव महल्ले, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).

**प्रति,**

१. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,
३. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती,
६. निवडनस्ती/तांशि-१.